# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. २२९/२०२५

**विषय : परिपत्रक क्र. १२५ दि. ०१ जून, २०११ अंतर्गत नमुद अभ्यासक्रमाच्या परीक्षा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून विद्यापीठ स्तरावर आयोजित करण्याबाबत...**

संदर्भ : १. परिपत्रक क्र. १२५ संदर्भ परीक्षा/समन्वय/७१० दि. ०१ जून, २०११.
२. मा. विद्या परिषदेचा ठराव क्र. वि.प.क्र.ब.६२पीए/६२/२०२५, दि. ०९ जून, २०२५.
३. मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचा ठराव क्र. २९/२०२५ दि. ११ जून, २०२५.
४. मा. विद्या परिषदेचा ठराव क्र. वि.प.क्र.अ.०३पीए/०३/२०२५, दि. ०१ ऑगस्ट २०२५.

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार महाविद्यालयाकडे विविध विद्याशाखाअंतर्गत अभ्यासक्रमनिहाय वर्ग करण्यात आलेल्या परीक्षा (विद्यापीठ विभाग आणि राष्ट्रीय महत्व असलेल्या आर्मी, नेव्ही, एअरफोर्स, एनसीएल इत्यादी संस्था वगळून) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून विद्यापीठामार्फत विद्यापीठाचे नियम व मार्गदर्शक तत्वानुसारच आयोजित करण्याचे ठरले आहे. त्याअनुषंगाने –

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिपत्रक क्र. १२५ दि. ०१ जून, २०११ यासंदर्भातील सर्व परिपत्रके/सूचना रद्द करण्यात येत आहेत.
२. विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग आणि राष्ट्रीय महत्व असणाऱ्या संस्था (उदा. आर्मी, नेव्ही, एअरफोर्स व एनसीएल) या अभ्यासक्रमाच्या परीक्षा पध्दतीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून परिपत्रक क्र. १२५ दि. ०१ जून, २०११ मध्ये नमूद केलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा व पुढे टप्प्याटप्प्याने द्वितीय/तृतीय/अंतिम इत्यादी वर्षाच्या परीक्षा विद्यापीठामार्फत इतर परीक्षाप्रमाणेच आयोजित करण्यात येतील, याची नोंद घ्यावी. तसेच सदर प्रक्रीयेसंदर्भात वेळोवेळी आवश्यक परिपत्रक/सूचना निर्गमित करण्यात येतील.

संदर्भ : परीक्षा–समन्वय/७२७

दिनांक : ०४/०९/२०२५

प्रा. (डॉ.) प्रभाकर देसाई
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

१. मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संबंधीत संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था, पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा.
२. मा. कुलगुरु, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. मा. प्र-कुलगुरु, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
४. वित्त व लेखाधिकारी, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
५. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/कक्षाधिकारी, छाननी व तालिनीकरण कक्ष, सा.फु पुणे विद्यापीठ, पुणे.
६. उपकुलसचिव, गोपनीय कक्ष, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
७. उपकुलसचिव, प्रमाणपत्र कक्ष, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
८. विभाग प्रमुख, माहिती व व्यवस्थापन कक्ष, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
९. उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग (शिक्षक मान्यता) , सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
१०. उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष), सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.